**महाराष्ट्र शासन**

क्र.मअसे/५६/२०१८/१२६४
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : info@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : ०५ सप्टेंबर,२०१८.

प्रति,
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष नियोजन प्राधिकरणे,
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा/नगरपंचायती,
शासनाच्या अन्य अग्निशमन सेवा

विषय : दिनांक २६ जानेवारी, २०१९ व दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ या अनुक्रमे प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनानिमित्त भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना जाहिर होणा-या विविध अग्निशमन सेवा पदकांसाठी शिफारशी पाठविण्याबाबत.

***महोदय,***

प्रतिवर्षी दिनांक २६ जानेवारी या प्रजासत्ताकदिनी व १५ ऑगस्ट या स्वातंत्रदिनी अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालीलप्रमाणे विविध अग्निशमन सेवा तसेच अग्निशमन शौर्य पदके जाहिर करण्यांत येतात.

**अग्निशमन सेवा पदके (Fire Service Medals)**

(१) गुणवत्तापूर्ण सेवेसाठी अग्निशमन सेवा पदक (Fire Service Medal for Meritorious Service)

(२) उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा पदक
(President's Fire Service Medal for Distinguished Service)

**अग्निशमन सेवा शौर्य पदके (Fire Service Medals for Gallantry)**

(१) राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा शौर्य पदक (President's Fire Service Medal for Gallantry)

(२) अग्निशमन सेवा शौर्य पदक (Fire Service Medal for Gallantry)

०२. सदर पदकांसाठी लागणा-या आवश्यक त्या अटी-सुचना, शिफारशींचे नमुने, इ. माहिती या पत्रासोबत जोडण्यात येत आहेत. त्याचे कृपया काळजीपूर्वक अवलोकन व्हावे. दिनांक २६ जानेवारी, २०१९ या प्रजासत्ताक दिनी व १५ ऑगस्ट, २०१९ या स्वातंत्रदिनी मा.राष्ट्रपतींच्या वतीने जाहिर होणा-या **गुणवत्तापूर्ण सेवेसाठी अग्निशमन सेवा पदक (Fire Service Medal for Meritorious Service)** व **उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा पदक (President's Fire Service Medal for Distinguished Service)** या अग्निशमन सेवा पदकांच्या शिफारशी खालीलप्रमाणे दिलेल्या अंतिम दिनांकापूर्वी या कार्यालयात १४ प्रतीत (पैकी किमान दोन प्रती शिफारसकर्त्यांच्या मुळ स्वाक्षरीतील असाव्यात) पोहचणे आवश्यक आहे. अंतिम दिनांकापूर्वी शिफारशी पाठविणे शक्य नसल्यास त्या पुढील प्रसंगी पाठविण्यांत याव्यात कारण ही सततची प्रक्रिया (on going process) आहे. शिफारशी पाठविण्याच्या तारखा त्यापुढील वर्षांसाठी सुध्दा खालीलप्रमाणेच राहतील.

| पदके जाहिर होण्याची तारीख | केंद्राय गृह मंत्रालयास शिफारशी पोहचण्याची अंतिम तारीख | शिफारशी या संचालनालयास पाठविण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|
| २६ जानेवारी, २०१९ - प्रजासत्ताक दिन | २६ ऑक्टोबर,२०१८ | **२९ सप्टेंबर,२०१८** |
| १५ ऑगस्ट, २०१९ - स्वातंत्र्य दिन | १५ मे,२०१९ | **३१ मार्च,२०१९** |

कृ.मा.प.

०३. अग्निशमन सेवा पदकांच्या शिफारशी परिशिष्ट-बी (Appendix-B) च्या विहित नमुन्यात कागदाच्या दोन्ही बाजूस टंकलिखित असाव्यात. शिफारस नमुन्यातील अनुक्रमांक ८ मधील Integrity Certificate च्या नमुन्यानुसार Integrity Certificate अग्निशमन सेवा विभागाचे प्रमुखांनी प्रमाणित करावे व त्याखाली कार्यालयाचा शिक्का व सिल आवश्यक आहे. शिफारशीमधील Citation अधिकतम ५०० शब्दात द्यावयाचे आहे. परंतु शिफारश्ीत हे Citation अतिशय थोडक्यात दिलेले असते. म्हणून Citation विस्तृत व समर्थनासह देण्यांत यावे व मागील किमान ८ वर्षात केलेल्या विशेष कार्याचा उल्लेख असावा. तसेच महानगरपालिका/नगर परिषदा यांचेमार्फत अग्निशमन सेवेतील संबंधीतांना त्याच्या सेवा कालावधीत मिळालेली प्रशस्तीपत्रे, रोख बक्षिसे, पदके तसेच सेवा कालावधीतील विशेष नोंदी याचा उल्लेख अनुक्रमांक ७ मध्ये करण्यांत यावा. अन्य कोणतीही कागदपत्रे जोडण्यांत येवू नयेत.

०४. तसेच President's Fire Service Medal for Gallantry आणि Fire Service Medal for Gallantry या शौर्य पदकांच्या शिफारशी हया परिशिष्ट-ए (Appendix-A) मध्ये कागदाच्या दोन्ही बाजूस टंकलिखित करुन त्या सदर घटना घडल्यापासून एका वर्षाच्या आत राज्य शासनामार्फत केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली येथे पोहचणे आवश्यक आहे. त्यामुळे शौर्य पदकाच्या शिफारशी हया संबंधीत घटना घडल्यापासून लवकरात लवकर या कार्यालयात १४ प्रतीत (पैकी किमान दोन प्रती शिफारस कर्त्याच्या मुळ स्वाक्षरीतील असाव्यात) पाठविणे आवश्यक आहे. या पदकाच्या समर्थनार्थ शिफारशीसोबत एफ.आय.आर., ऑकरन्स बुकमधील नोंदींचा उतारा, जखमीं व्यक्ती, मृत व्यक्ती इत्यादींचा मेडिकल रिपोर्ट किंवा पोस्ट मॉर्टेम रिपोर्ट, तसेच मागील १० वर्षाचे गोपनीय अहवालाची प्रतवारी (नमुना सोबत जोडला आहे) इत्यादीच्या साक्षांकित प्रती सोबत जोडणे तसेच घटनास्थळाचे फोटोग्राफ, वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे इत्यादी सोबत जोडावेत. परिशिष्ट-ए मध्ये दिलेल्या Integrity Certificate च्या नमुन्यानुसार शौर्य पदकांच्या शिफारशींसाठीही Integrity Certificate अग्निशमन सेवा विभाग प्रमुखांनी प्रमाणित करावे व त्याखाली कार्यालयाचा शिक्का व सिल आवश्यक आहे.

०५. मा.राष्ट्रपतींच्या वतीने जाहिर होणा-या अग्निशमन सेवा पदकांच्या शिफारशी महत्वाच्या असल्याने याबाबत अत्यंत गोपनियता ठेवण्यात यावी. महानगरपालिकेंच्या अग्निशमन दलाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या शिफारशी हया महापालिका आयुक्त यांच्या सहीने व नगर परिषदांच्या अग्निशमन दलाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या शिफारशी हया मुख्याधिकारी यांच्या सहीने, रबर स्टॅम्प व ऑफिस सिलसह १४ प्रतीत असाव्यात (पैकी किमान दोन प्रती शिफारस कर्त्याच्या मुळ स्वाक्षरीतील असाव्यात). महानगरपालिकांच्या प्रकरणी शिफारशींचे अधिकार अतिरिक्त / उप आयुक्त यांना प्रदान केले असल्यास तसा स्पष्ट उल्लेख शिफारस पत्रात करण्यांत यावा तथापी महापालिका आयक्त यांच्या मान्यतेनेच शिफारशी पाठविण्यांत येत आहेत असा उल्लेख शिफारस पत्रात करावा.

०६. ज्या अधिकारी / कर्मचारी यांची वरील पदकांसाठी शिफारस केली आहे त्यांचेबाबत विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित केलेली नसावी. ज्या प्रकरणात विभागीय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही अशा प्रकरणी त्याअनुषंगाने प्रमाणपत्र शिफारस पत्रात देण्यांत यावे. या प्रमाणपत्राशिवाय शिफारशींचा विचार केला जाणार नाही तसेच या कार्यालयाच्या सुचनेनुसार आगीपासून होणा-या जीवीत व वित्तहानीबाबतचा सहामाही अहवाल व अन्य अहवाल ज्या अग्निशमन सेवांनी या कार्यालयाकडे पाठविला नसेल त्यांच्या शिफारशी विचारात घेतल्या जाणार नाही. म्हणून शिफारशी पाठविताना विविध अहवाल पाठविण्याबाबत अभिप्राय देण्यात यावा.

सदर पत्र, अटी-सुचना व शिफारशींचे नमुने www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

आपला विश्वासू,

(प्र.सु.रहांगदळे)
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रतः मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग (नवि-१४), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

56-B/C-Medal Circular